महाराष्ट्र पोलीस
यवतमाळ पोलीस

## पोलीस अधीक्षक कार्यालय, यवतमाळ

## प्रेस नोट, दिनांक :- १९/०७/२०२३

---

### ऑनलाईन फसवणुकीतील १ लाख ९१ हजार रुपये होल्ड..
### सायबर पोलीस ठाणे, यवतमाळ यांची कामगिरी.

दिनांक-०९/०५/२०२३ रोजी तक्रारदार अरविंद झाडे रा. गिलानी नगर, यवतमाळ यांना मो.क्रं. +६२३२३९-४४६८ या नंबरवरुन त्यांचे व्हॉटसअपवर एक मेसेज आला की, तुम्हाला दिलेले एक टास्क जर तुम्ही पुर्ण केले तर रिवार्ड देण्यात येतील असा मेसेज पाहिल्यानंतर तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईलवर आलेले टास्क पुर्ण केले. (त्यामध्ये त्यांना वेगवेगळ्या हॉटेल्सचे नांव व जाहिराती पाठविल्या होत्या त्यास रेटिंग देण्याचे टास्क देण्यात आले होते.) यांनतर तक्रारदार यांचेसोबत व्हॉटसअपवर चॅटींग करताना त्यांना काही पैसे पाठविण्यास सांगितल्याने तक्रारदार यांनी वेगवेगळे Transaction करुन एकुण २,९१,०००/- रुपये पेटीएम व्दारे ICICI, Yes Bank खात्यावर पाठविले. एवढे पैसे पाठविल्यानंतरही तक्रारदार यांना पैशाची मागणी सुरुच होती व त्यांना कोणत्याहीप्रकारे पैसे परत येत नव्हते. त्यामुळे तक्रारदार यांनी सायबर पोलीस स्टेशन,यवतमाळ येथे धाव घेवुन त्यांचेसोबत सुरु असेलल्या प्रकाराबाबत सांगितले. सायबर पो.ठाणे येथील अधिकारी व अमंलदार यांनी तात्काळ तक्रारदार यांचेकडील माहिती घेवुन बँक स्टेटमेंटमधील व्यवहाराचा अभ्यास करुन National cyber crime Portal यावर तात्काळ तक्रार नोंदविल्याने तक्रारदार यांचे १ लाख ९१ हजार रुपये होल्ड करण्यात यश आले आहे.

सदरची कार्यवाही डॉ. पवन बन्सोड पोलीस अधीक्षक, यवतमाळ, श्री. पियुष जगताप अपर पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि विकास मुंढे, पोशि अजय निबोंळकर, अभिनव बोंद्रे, सायबर पो.ठाणे यवतमाळ यांनी पार पाडली.

याद्वारे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, आपल्याला लॉटरी, जॉब ऑफर, ईलेक्ट्रीक बिल, क्रेडीट कार्ड, ऑनलाईन लोन ईत्यादीबाबत अनोळखी मोबाईल नंबरवरुन कॉल/व्हॉटसअप मेसेज आल्यास अशा प्रकारच्या कोणत्याही अनोळखी कॉलला प्रतिसाद देवु नका किंवा कोणत्याही लिंकवर क्लीक करु नका. त्याचप्रमाणे Google वर Costumer care contact number सर्च करताना खात्री केल्याशिवाय सर्च केलेल्या मोबाईल क्रंमाकावर संपर्क करु नका. दुर्दैवाने आपल्यासोबत सायबर क्राईमचा प्रकार घडल्यास तात्काळ सायबर पोलीस स्टेशन येथे संपर्क करावा. तसेच १९३० या हेल्पलाईन नंबरवर संपर्क साधावा किंवा www.cybercrime.gov.in या पोर्टलवर जावुन सायबर क्राईमबाबत ऑनलाईन तक्रार सुध्दा नोंदविता शकता, सतर्क रहा सुरक्षित रहा..

**(प्रभारी अधिकारी)**
सायबर पो.ठाणे,यवतमाळ